## निशाणी क्र. २० कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तावित प्रतिवादी क्र. १/१ यांनी आपले म्हणणे दाखल करुन जनार्दन गोविंद नाकती यांचा मृत्यू दिनांक २३/०६/२००० रोजी झाला असून त्याचा वादीस माहिती होती. तसेच अर्जामध्ये विलंबाचे संयुक्तीक कारण नमूद नाही. या कारणास्तव त्यांनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वाद पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते. दिनांक २९/०१/२०२१ रोजी दाखल झाला असून प्रतिवादी जनार्दन गोविंद नाकती दिनांक २३/०६/२००० रोजी मयत झाले आहे. दाव्याचे समन्स तामील झाल्यानंतर प्रस्तावित प्रतिवादी क्र. १/१ यांनी निशाणी क्र. १० कडील पुरसिस द्वारे जनार्दन गोविंद नाकती यांचा मृत्यू झाल्याचे कळवले आहे. या सर्व कारणास्तव प्रस्तूतचा अर्ज मंजूर करून मयत प्रतिवादी जनार्दन गोविंद नाकती यांचे वारसांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी जनार्दन गोविंद नाकती यांचे वारस अभिलेखावर

घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ३०/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड